# वि.दि.मु.क.४/२०११ मध्ये नि.७८ लगत आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाव्यात दुरुस्तीस परवाणगी मिळणेसाठी दाखल करणेत आलेला आहे की ज्याद्वारे वादी दाव्यात माजलगांव नगरपरिषदेचे हद्दीतील घर क.११ ची मिळकत तिने माहेरच्या जमिनीचे उत्पन्नातुन खरेदी घेतली असुन पुढे ती वादी क.३ ला विक्री केलेली आहे आणि त्यामुळे ही मिळकत एकत्र कुटूंबाची नाही वगैरेचा मजकुर वाढवु इच्छिते. या अर्जास कोणाही प्रतिवादीने त्यांचे तर्फे लेखी म्हणने देवुन हरकत नोंदविली नाही.

२) वादीतर्फे विद्धवान वकिलांचा युक्तीवाद ऐकता आणि या अर्जात दिले कारणे विचारात घेता हे न्यायालय असा निष्कर्ष काढते की, प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे मुळ रचनेत कोणताही बदल होत नाही किंवा त्यामुळे कोणाही प्रतिवादीचे हक्कांवर विपरित परिणाम होत नाही. उलट प्रस्तावित मजकुर दाव्याचे अंतिम गुणदोषावर निर्णयाच्या दृष्टीने आवश्यक व जरुरीचा ठरतो. करीता पुढील प्रमाणे आदेश.

## :: आ दे श ::

१) अर्ज मंजुर करणेत येत असुन या आदेश तारखे पासुन चौदा दिवसांचे आत या अर्जात नमुद केले प्रमाणेची दुरुस्ती करणेत येवुन दुरुस्त दावा प्रत न्यायपटलावर ठेवणेत यावी.

२) दावा दुरुस्ती नंतर एक महिन्याचे कालावधीत दुरुस्त दाव्यास जरुर तर पुरवणी कैफियत किंवा सध्याचे कैफियतीत दुरुस्ती करणेची प्रतिवादींना मुभा आहे.

स्वाक्षरीत/-

माजलगांव.
दि.१२-७-२०१६

( शौ. रा. फकीर )
दिवाणी न्यायाधीश व स्तर,
माजलगांव.